भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2025 ◑ DY 667243

21 NOV 2025

दिनांक वि.क्र. 30290 मुद्रांक शुल्क रक्कम 500

दस्त नोंद करणार आहे का-होय/नाही, नोंदणी होणारे दु.नि.कार्या.--------

दस्ताचा प्रकार / अनुच्छेद क्रमांक / कारण --------MOU--------

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता प्राचार्य नाईट कॉलेज कोल्हापूर

दुसऱ्या पक्षकाराचे नांव व पत्ता ------------------------

हस्ते नांव व पत्ता ------------------------

मोबदला रक्कम - मिळकतीचे वर्णन ----------------

मुद्रांक विक्रेत्याची सही/

परवाना तरोच मुद्रांक विक्रेत्याचे ठिकाण नांव व पत्ता - चंद्रकांत सिताराम शिंपळे (स्टँप व्हेंडर) ला. नं. ११९/८८, कोड नं. २८०१०३२ महालक्ष्मी चेंबर्स, शॉप नं. ई-२८ कोल्हापूर

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही/

श्री. चंद्रकांत सितराम शिंपळे परवाना क्रमांक ११९/८८ कोड नं. २८०१०३२ महालक्ष्मी चेंबर्स, कोल्हापूर.

TREASURY OFFICER KOLHAPUR

17 NOV 2025

STAMP HEAD CLERK
TREASURY OFFICE
KOLHAPUR (M.S.)

# सामंजस्य करार

## (MEMORANDUM OF UNDERSTANDING)

## नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर

## मराठी विभाग

## आणि

## जागतिक मोडी प्रसार समिती, मुंबई



प्राचार्य
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड कॉमर्स,
कोल्हापूर.

नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर मराठी विभाग आणि जागतिक मोडी प्रसार समिती, मुंबई या संस्था एकमेकांबरोबर दि. 21 नोव्हेंबर 2025 रोजी सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

- उद्दिष्टे

1. मोडी लिपी, मोडी साहित्य यांचे जतन व संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे
2. मोडीविषयक चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, साहित्य संमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे
3. मोडीविषयक अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्सेस राबविणे व त्यासाठी सहयोग व सहकार्य करणे.
4. मोडी लेखन स्पर्धा, शीघ्र मोडी लिप्यंतर स्पर्धा, मोडी निबंध स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे
5. मोडी शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन व लिप्यंतरविषयक प्रकल्प राबविणे
6. मोडी लिपी, कागदपत्रांचे जतन व लिप्यंतरविषयक प्रकल्प राबविणे
7. ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे
8. मोडी लिपी, मोडी साहित्य या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना कळविणे व त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.
9. दोन्ही संस्थांच्या हिताचे विविध उपक्रम राबविणे

- **एकमेकांना साहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

1. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे
2. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे
3. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थांकडून एक निश्चित योजना तयार करणे
4. सल्ला, सेवा, साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे
5. मोडी लिपी व साहित्याचे चर्चासत्र, अधिवेशन, कार्यशाळा घेऊन विचारविनिमय करणे
6. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांच्या सौजन्याने विविध प्रकल्प राबविणे



**प्राचार्य**
**नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँन्ड कॉमर्स,**
**कोल्हापूर.**

- अटी

1. आपापल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे. नाइट कॉलेजच्या वतीने भौतिक सुविधा प्रदान करण्यात येतील. उपक्रमांसाठी येणारा खर्च समिती करेल.
2. कोणत्याही संस्थेस प्रवास व भोजनभत्ता देणे बंधनकारक नाही.
3. सदर **सामंजस्य कराराचा कालावधी दहा वर्षांचा म्हणजे आज दि. 21 नोव्हेंबर 2025 पासून ते दि. 20 नोव्हेंबर 2035 पर्यंत आहे.** त्यानंतर करार आपोआप संपुष्टात येईल. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.
4. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षांसाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.यासाठी लेखी अनुमतीची आवश्यकता बंधनकारक असेल.

- **समन्वय**

1. सदर कराराच्या समन्वय आणि अंमलबजावणीसाठी जागतिक मोडी प्रसार समिती, मुंबईचे अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष अथवा सचिव अथवा त्यांनी नियुक्त केलेले प्रतिनिधी काम पाहतील. तसेच महाविद्यालयाचे समन्वयक म्हणून प्राचार्य अथवा मराठी विभागप्रमुख काम करतील.
2. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटींशी अधीन राहून दोन प्रतींमध्ये अंमलात येत आहे.
3. दोन्ही संस्थांच्या वतीने खाली स्वाक्षरी केलेल्या अधिकाऱ्याच्या वतीने सदरहू सामंजस्य करार हा दि. 21 नोव्हेंबर 2025 पासून अंमलात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| प्रा. डॉ. अरुण शिंदे | प्रा. डॉ. उत्तम पाटील | नवीनकुमार माळी |
| विभागप्रमुख व समन्वयक | प्राचार्य | कार्यवाह |
| | **प्राचार्य** | |
| | **नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स, कोल्हापूर.** | जागतिक मोडी प्रसार समिती, |
| नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स | | मुंबई |
| कोल्हापूर | | |



Scanned with OKEN Scanner